स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

पीएच. डी. पदवी संशोधन सारांश

विषय

भारतीय लोकशाहीतील **माध्यमांच्या** भुमिकेचा विश्लेषणात्मक अभ्यास विशेष संदर्भ नवमाध्यमे

संशोधक

गजानन मधुकर घायाळ

मार्गदर्शक

प्रा. डॉ. संतोष पाटील

दयानंद कला महाविद्यालय, लातूर

संशोधन केंद्र

पिपल कॉलेज, नांदेड

सन २०१९

भारतीय लोकशाहीतील **माध्यमांच्या** भुमिकेचा विश्लेषणात्मक अभ्यास विशेष संदर्भ नवमाध्यमे

प्रस्तावना

आधुनिक जगात लोकशाहीचा विकास हा तीव्र गतीने झाला आहे यामध्ये माध्यमांची भूमिका खूप महत्त्वाची ठरली आहे. लोकशाही सतत बदलत असते कारण सध्या सामाजिक आणि राजकीय गतिशीलतेचा वेग हा आधुनिक युगात खूप वाढलेला आहे. माहिती तंत्रज्ञानात माध्यमांचा विकास आणि ते तंत्रज्ञान अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचण्याने ही प्रक्रिया अधिक गतिमान झाली आहे. माहितीचे स्वरूपच असे आहे, की जसजशी माहिती प्रसरण पावते तसतशी नवीन सत्ताकेंद्रे तयार होत आणि जातात व असलेल्या सत्ताकेंद्रांवर विशिष्ट दबाव तयार होतो. त्यातील काही कालबाह्य होतात, काही सत्ताभ्रष्ट होतात आणि काहींना आमूलाग्र बदल करावा लागते. प्रामुख्याने संस्था व संघटनांच्या माध्यमातून लोकशाही राबविली जाते. त्यामुळे लोकशाही बदलत गेली, की यांच्यातही बदल होतो. भारतातील लोकशाही अशाच काही बदलांतून जात आहे. गेल्या पाच ते सहा वर्षांत तर हा बदल झपाटय़ाने झाला आहे. याचे कारण नव माध्यमांचा प्रसार आणि त्याची परिणामकता, कारण माध्यमे लोकशाहीचा सशक्त आधार स्तंभ आहेत वर्तमानपत्र, रेडिओ, टि.व्ही, समाज माध्यमे यासारख्या सर्व जनसंपर्क माध्यमांचा समावेश माध्यमात होतो. कोणत्याही देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक गतिविधिंचे प्रतिबिंब आपल्याला माध्यमात दिसत असते. प्रसार माध्यमे हे लोकांचे विचार आणि दृष्टीकोनाला प्रभावित करत असतात. अनेक देशात झालेल्या सामाजिक आणि राजकीय क्रांत्यांमध्ये माध्यमांची भूमिका महत्वपूर्ण राहिली आहे. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात केसरी आणि मराठा यासारख्या वर्तमानपत्रांनी इंग्रजांविरूद्ध लोकजागृती करण्याचे काम केल्याचे दिसून येते. अण्णा हजारे यांनी लोकपालसाठी दिल्लीच्या रामलीला मैदानावर जेंव्हा आंदोलन केले होते तेंव्हा या आंदोलनाला तसेच भ्रष्टाचार विरोधी आंदोलनास लोकांचा मोठा पाठिंबा मिळवून देण्यात माध्यमांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. यात इलेक्ट्रॉनिक आणि समाज माध्यमे यांचा महत्वाची भूमिका होती. प्रसार माध्यमाच्या लोकशाहीतील सशक्त आणि महत्वपूर्ण भूमिकेमुळेच बिट्रनचे प्रसिद्ध राजकीय विचारवंत आमण्ड बर्क यांनी माध्यमांना लोकशाहीच्या चौथ्या आधारस्तंभाची उपाधी दिली.

लोकशाही देशांत सर्वात मोठा राजकीय उत्सव तो निवडणुकांचा त्यात भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असणाऱ्या राष्ट्रासाठी तर हा एक महापर्व असतो. लोकशाही मध्ये निवडणुकांना अनन्यसाधरण महत्व आहे. निवडणुकात मते मागण्यास राजकीय पक्ष माध्यमांचा पुरेपूर वापर करतात. निवडणुकांच्या या महाप्रक्रियेत मत मागण्याची पद्धत नेत्यांचा जनतेशी संवाद साधण्याची माध्यमे, आपल्या आश्वासनांचा प्रचार

करण्यासाठी वापरली जाणारी माध्यमे, जनमत एकघट्टा करण्यासाठी आणि आपले मत जनतेपर्यंत पोचवण्यायासाठी वापरल्या जाणाऱ्या नवनवीन क्लृप्त्याच्या तंत्रज्ञानात काळानुसार विविध बदल होत गेले. त्याच बरोबर स्थानिक निवडणुकांपासून ते राष्ट्रीय पातळीवरील निवडणुकांपर्यंत विविध स्तरावर होणाऱ्या निवडणुकात वापरली जाणारी पुर्वीची पारंपरिक संवाद माध्यमांना बगल देत, सध्या आधुनिक प्रचार युगात नव समाज माध्यमे आणि त्याचे तंत्र यात लक्षणीय बदल झाला आहे. जनतेपर्यंत पोचने सोपे झाले आहे. यामुळे आताच्या डिजिटल युगातील माध्यमांतील बदलामुळे निवडणूक प्रचार आणि एकूणच प्रक्रियेत झालेल्या बदल भारतीय लोकशाहीसाठी एक सकारात्मक बदल आहे.

<u>भारतीय लोकशाही आणि समाज माध्यमे</u>

आधुनिक युगात समाजमाध्यमांकडे लोकशाहीचा पाचवा स्तंभ म्हणून पाहिले जात आहे. हा पाचवा स्तंभही लोकशाहीच्या विकासासाठी महत्त्वाचा मानला जाऊ लागला आहे. सुदृढ लोकशाहीसाठी प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य हा तसा आपल्याकडचा एक निर्विवाद मुद्दा आहे. पण माध्यमांवरील बंधनांचा संबंध थेट आणीबाणीशी जोडला जाण्याचा आपल्याकडचा इतिहास विचारात घेता, लोकशाही मध्ये प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्याला तसे कोणीही नाकारत नाही. लोकशाहीच्या विकासासाठी प्रसारमाध्यमांनी या पूर्वीच्या काळात केलेले कार्य पाहता, लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणूनच आपल्याकडे त्यांचा विचार केला जातो. त्याच अनुषंगाने आता सध्याच्या आधुनिक युगात नवमाध्यमे म्हणजे ट्विटर, फेसबुक, व्हाट्सअँप, इंस्टाग्राम, युट्रब या सारख्या समाजमाध्यमांकडे पाचवा स्तंभ म्हणूनही पाहिले जात आहे. यावर कोणाही कोणत्याही बंधन शिवाय व्यक्त होऊ शकतो आणि आपले मत सहज मांडून प्रसारीत करू शकतो. चौथ्या स्तंभापाठोपाठ आलेला हा पाचवा स्तंभही आपल्याकडे लोकशाहीच्या विकासासाठी म्हणून महत्त्वाचा मानला जाऊ लागला आहे.

समाज माध्यमे म्हणजे (सोशल मीडिया) नावाचं दुधारी शस्त्र मानवाच्या हाती लागलं आणि या माध्यमाने संवादाच्या सर्व व्याख्याच बदलून टाकल्या. आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी स्वतःच्या पातळीवर व्यक्त होण्यास एक हक्काचं व्यासपीठ मिळालं आहे. या माध्यमातून व्यक्ती आपले मते, फोटो, व्हिडिओ सह प्रभावीपणे मांडू शकतो. माहितीच्या देवाण घेवाणीचा वेग प्रचंड वाढला आहे. आज एक व्यक्ति जगातील कुठल्याही कोपऱ्यातून दुसऱ्या व्यक्तीशी सोशल नेटवर्कींग साईटच्या माध्यमातून सहज संवाद साधू शकतो. आणि हे सर्वांच्या पसंदीचे माध्यम झाले आहे. थोडक्यात काय तर समाज माध्यमे हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. याच गोष्टीचा फायदा घेत भारतीय निवडणुकात याचा वापर प्रचारतंत्रात केला जाऊ लागला. आणि कमी वेळात जनतेशी संपर्क साधण्यास याचा वापर समाजात मोठ्या प्रमाणात होऊ लागला. समाज माध्यमांचा वापर हा आजच्या तरुणाई पासून ते वृद्धापर्यंत होतांना दिसून

येतो. यावर कोणीही आपले मत मांडू शकतात. यातून अनेक लोक स्वतःचा पातळीवर कोणताही बंधनाविना व्यक्त होतात. त्यातून मिळणार प्रतिसाद हा उल्लेखनीय असतो.

माध्यमांचा स्वार्थासाठी वापर करून सत्तेवर नियंत्रण मिळवणाऱ्यांची उदाहरणे जगभरात चर्चेला आलेली आहेत. भारतात सुद्धा २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकात भारतीय जनता पक्षाने माध्यमांचा प्रभावीपणे वापर केला आणि निवडणुका जिंकल्या, या ठिकाणी सत्ता म्हणजे केवळ राजकीय सत्ता असा विचार न करता ती सामाजिक-आर्थिक-सांस्कृतिक अशा अर्थानेही आपण विचारात घेऊ शकतो. कारण माध्यमातून प्रोपागंडा यशस्वीरीत्या रुजवता येतो आणि त्याची परिणामकता व्यापक असते. २०१४ पूर्वीचा तो काळ आणि सध्याचा काळ यामधील एक महत्त्वाचा फरक म्हणजे पारंपरिक माध्यमांचे वा समाजमाध्यमांचे अस्तित्त्व आणि त्याचा सर्व सामन्यांच्या जीवनातील प्रभाव. यापूर्वी अशी माध्यमे हि लोकांच्या थेट हातात गेलेली अस्तित्वात नव्हती. त्यामुळे लोकांना सरकारच्या विरोधात लोकशाही मार्गानेच विशिष्ट ठरावीक मार्गानेच विरोध करण्याची संधी मिळत पण त्या कडेही कोणाचेही लक्ष जात नसत. पण समाजमाध्यमांच्या येण्याने लोकशाहीत आपले प्रश्न सर्वोच्च पातळी पर्यंत पोचवण्यास मदत झाली आहे. आणि लोकशाही मध्ये नागरिकांना अभिव्यक्त होण्यास सुलभता आली आहे, त्यामुळे नव माध्यमांमुळे अभिव्यक्त होण्याची व्यापकता वाढवली आहे. पर्यायाने पूर्वीच्या काळात पारंपरिक माध्यमांनी आपल्याला अशी संधी नाकारली ती आता समाजमाध्यमांनी मिळवून दिली, हीच खरी लोकशाही, अशी एक वेगळी भावनाही आता तीव्र होऊ लागली आहे.

<u>भारतीय निवडणुका आणि समाज माध्यमे -</u>

भारतात २०१४ नंतर प्रचार तंत्रात खूप मोठे बदल झाले त्यात भारतातील इंटरनेट वापर करणाऱ्यांची वाढलेली संख्या हे या नव प्रचार तंत्रास पूरक ठरले. भारतातील सध्याची समाज माध्यमे वापरणाऱ्यांची संख्या आणि २०१२ वर्षापूर्वीची स्थिती आणि आताची २०१९ मधील स्थिती यांत फार मोठा फरक आहे. २०१५ साली भारतात सुमारे १४ कोटी लोक समाज माध्यम वापरत होते. २०१९ मध्ये ती संख्या ३५ कोटींवर गेली आहे. ट्विटर, यूट्यूब, फेसबुक आणि व्हॉट्सअॅप ही भारतातील सर्वांत जास्त लोकप्रिय समाज माध्यमे आहेत. याची जनतेतील लोकप्रियता पाहून विविध राजकीय पक्षांनी समाज माध्यमातून प्रचारासाठी आय. टी. सेल निर्माण केले. निवडणुकांच्या काळात राजकीय पक्षांना आणि त्यांच्या उमेदवारच्या प्रतिमेला प्रोत्साहन देण्यासाठी प्रसार माध्यमे हे राजकीय पक्षांचे जाहीरनामे, कार्यक्रम, धोरणे, उमेदवार आणि त्यांची कामगिरी प्रभावीरीत्या जनतेपर्यंत पोचवण्यास आणि सत्तेच्याच्या गैरवर्तन, एकाधिकारशाही विरुद्ध विरोध करण्यासाठी समाज माध्मये महतवाच्या भूमिका बजावतात. कारण सर्व वर्गात लोकप्रिय असल्यामुळे सोशल मीडियाने

भारतातील आणि जगभरातील राजकारणावर प्रभाव टाकला आहे. त्याचा परिणामातून सर्वच पक्ष प्रभावित झाले आहेत. त्यामुळे निवडणुकीच्या काळात उमेदवाराची लोकप्रियता वाढवण्यास आणि जनता आणि राजकीय पक्ष यांच्यातील संबंध घट्ट करण्यास महत्तवाची भूमिका बजावतात. देशभरातील लोकांशी कमी वेळात आणि पारंपारिक माध्यमापेक्षा कमी वेळात समाज माध्यमातुन लवकर पोहोचता येते. यामुळे निवडणूक आयोगाने आयोगाने फेसबुक आणि ऑनलाईन मोबाइलवरील जाहिराती, इंटरनेटवरील जाहिराती, व्यावसायिक संकेतस्थळे व ब्लॉग यांचाही समावेश निवडणूक खर्चा मध्ये केला.

भारतीय राजकारणात समाज माध्यमांचा वापर हा २०१२ च्या दिल्ली विधानसभाच्या निवडणूक मध्ये मोठया प्रमाणात करण्यात आला. त्यावेळी भारतात समाज माध्यमे हि आधुनिक युगातील संवादाची माध्यमे म्हणून नुकतीच उदयास आली होती. भारतात त्यावेळी याचा वापर कर्त्यांची संख्या हि मर्यादित होती. पण नंतरच्या काळातील स्वस्त स्मार्ट फोन आणि फोर जी तंत्रज्ञान यामुळे समाज माध्यमांच्या वापरात खूप मोठी वाढ झाली. आणि २०१४ मध्ये भारतीय जनता पक्षाने या गोष्टीचे महत्व लक्षात घेत ऑनलाईन आणि ऑफलाईन माध्यमांचा प्रभावीरीत्या वापर करून यशस्वी प्रचार केला आणि निवडणूक जिंकल्या. यात याचे महत्वाचे वैशिष्ट म्हणजे हे माध्यम स्वतःपासून सुरवात आणि तात्काळ मास सुमहापर्यंत पोचण्यासाठी उत्तम माध्यम ठरले आहे. यामुळे आजचे युग आधुनिक संवाद क्रांतीची झाले आहे. आधुनिक लोकशाहीमध्ये माध्यमे महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

<u>संशोधनाचे महत्तव</u>

भारतात २०१२ पासून पासून विविध सामाजिक, राजकीय बदल घडवण्यात माध्यमांचा सहभाग हा खूप मोठा आहे. यातून राज्य व्यस्थेत विविध रचनातम्क बदल होऊन परिवर्तन झाले, आणि याचे समाजात दीर्घकालीन परिणाम पडले. समाजात घडत असलेले रचनात्मक बदल नोंदविणे व ते गतिमान करणे हा संवादाचा विकास होय. माध्यमातून संवाद हि अवितरत चालणारी प्रक्रिया आहे. वंचित क्षेत्रात माध्यमे विकासाला पोषक वातावरण निर्माण करतात. आणि अशा जागृतीतुन मानवी जीवनाचे चित्र बदलून सामाजिक बांधिलकीची भावनाही रूजू लागते. विकसनशील राष्ट्रांमध्ये नवीन जिवनमुल्ये रूजविण्याचे काम माध्यमे करतात. कारण त्यांचा व्यासंग सर्वत्र असतो. सध्या काही माध्यमांची पत्रकारिता विविध पक्षांच्या चरणी वाहिलेली आहे त्यांच्या अशा वागण्याने सत्य परिस्थिची माहिती जनतेपर्यंत पोहचत नाही. आणि काही अस्तित्वात नसलेल्या गोष्टी दाखवून जनतेची दिशाभूल केली जाते. यामुळे विविध संकटांना सामोरे जावे लागत आहे. पण अशा वेळी समाज माध्मातुन जनतेपर्यंत सत्य पोचवण्यासाठी नव समाज माध्यमे महत्वाची भूमिका निभावतात, कारण हि सर्वांसाठी उपलब्ध आहेत. आज ट्विटर, फेसबुक पेज, यूट्रब चॅनेल, या विविध माध्यमातून

लोकांसमोर सत्य समोर आणले जातात. म्हणजे एखाद्या कडे समाज उपयोगी माहिती किंवा सत्य असेल तर तो सहज रित्या ती शेयर करून ती सर्वत्र प्रसारीत करू शकतो.

लोकशाहीत स्वतःचा पातळीवर आपला आवाज मांडण्यास एक व्यासपीठ निर्माण झाले आहे. समाजमाध्यमे इतिहास घडवत नाहीत, ते फक्त इतिहासाचे साक्षिदार ठरतात मात्र ते हा इतिहास घडवण्यात मोलाची भुमिका बजावत असतात. राजकारणातील माध्यमच्या प्रभावामुळे राजकारणाचे माध्यमीकरण होते आहे. म्हणून आधुनिक संवादाच्या युगात राज्यशात्राचा विध्यार्थी म्हणून भारतीय लोकशाहीत आणि निवडणूकात राजकीय पक्षाच्या प्रचारासाठी माध्यमांचा वापर कसा होतो आहे याचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे आवश्यक वाटते.

संशोधनासाठीचे प्रश्न.

१) भारतीय लोकशाही मजबूत करण्यात नवमाध्यमांच्या भूमिकेचा अभ्यास.

२) भारतीय निवडणुकांमध्ये समाज माध्यमच वापर कसा होता गेला आणि त्यास कारणीभूत घटक

३) माध्यमांतून जनतेचे मत परिवर्तन होण्यास मदत होते का.

४) भारतीय निवडणुकात प्रचारात समाज माध्यमांचा मोठा प्रमाणात होणारा वापर आणि त्याची परिणामकता.

संशोधनाची ग्रहितकृत्ये

१) भारतीय लोकशाही मध्ये माध्यमांची भूमिका लोकशाही पूरक आहे

२) लोकशाही व्यवस्था पारदर्शक आणि मजबूत होण्यास माध्यामे प्रयत्नशील आहेत

३) आधुनिक काळात माध्यमांची लोकशाही प्रति जबाबदारीची भूमिका वाढत आहे

४) भारतीय निवडणुकांमध्ये माध्यमांचा होणारा वापर आणि त्याची परिणामतः खूप व्यापक आहे

५) २०१४ च्या निवडणुका पासून राजकारणात माध्यमांनी संवादात घडवून आणलेला बदल

६) २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकात समाज माध्यमांचा प्रभावीरित्या केलेला वापर

६) भारतीय निवडणुकात जनतेचे मत परिवर्तन करण्यात समाज माध्यमांची भूमिका महत्वपूर्ण ठरतात

७) भारतात काही माध्यमे सत्ताधारी राजकीय पक्षास पूरक भुमिका घेतात

८) भारतातील विविध सामाजिक आंदोलने यशस्वी करण्यात माध्यमांची सक्रिय भूमिका

संशोधनाची उद्दिष्ठे

१) लोकशाही व्यस्थेत माध्यमांचे कार्य काय आहे.

२) लोकशाही आणि समाज माध्यमे यांच्यातील आंतर संबंधाचा अभ्यास.

३) लोकशाही व्यस्थेतील सामाजिक आंदोलनातील माध्यमांची भूमिका.

४) सार्वत्रिक निवडणुकांमध्ये समाज माध्यमाचा वापर कशाप्रकारे केला जातो.

५) २०१४ पूर्वीची प्रचार माध्यमे आणि आताची प्रचार माध्यमातील यातील झालेले बदलाचा अभ्यास.

६) भारतात समाज माध्यमे किती प्रमाणात लोक पर्यंत प्रमाणात पोचली आहेत.

७) निवडणुकात प्रचार तंत्रात नव माध्यमांचा वापर लोकशाहीस कसा पूरक आहे.

८) समाज माध्यमातून होणार प्रचार हा निरपेक्ष होतो का आणि प्रचाराची आदर्श आचारसंहिता पाळली जाते का

९) सार्वजनिक निवडणुकांमध्ये समाज माध्यमांवरील आदर्श प्रचाराचासाठी निवडणूक आयोगाने कोणते नियम केले आहेत.

१०) भारतीय लोकशाही मजबूत करण्यात माध्यमाची भूमिका.

संशोधन साधने

प्राथमिक साधने

तथ्य संकलनाच्या प्राथमिक साधनात प्रश्नावली मुलाखत यांचा उपयोग करून माध्यमातील विविध माध्यम तज्ज्ञांच्या मुलाखती घेऊन त्यांच्याशी चर्चा करून माध्यमांची सध्याची भूमिका जाणून घेने. तसेच वि खाजगी संस्थांचे अहवाल सांख्यिकी माहिती या सर्वांचे विश्लेषण करून निष्कर्ष काढता येईल.

दुय्यम साधने

दुय्यम साधनांमध्ये संशोधन विषयासंबंधी तज्ञांचे संदर्भ ग्रंथ तसेच संशोधनपर लेख आणि वर्तमान पत्रातील लेख, ऑनलाइन विषयासंबंधी उपलब्ध तज्ञांच्या मुलाखती ऐकणे, माध्यमांचा संबंधी महत्त्वाचे पाहणी अहवाल, ऑनलाइन मासिकातील लेख, माध्यमांच्या संबंधित विविध कायदे व नियम

प्रकरणाची रूपरेषा

प्रकरण पहिले

प्रस्तुत विषयाची ओळख आणि विषय निवडण्याचा हेतू, संशोधन पद्धती, उद्दिष्टे यांचा आढावा

प्रकरण दुसरे

भारतीय लोकशाहीमध्ये स्वातंत्र्योत्तर काळापासून ते आता पर्यंत माध्यमांची भूमिका

प्रकरण तिसरे

लोकशाही मध्ये माध्यमे यांची भूमिका कशा प्रकारची आहे

प्रकरण चौथे

भारतात नव माध्यमांची सुरवात आणि त्यांची कार्यपद्धती आधुनिक लोकशहीत त्यांची भूमिका

प्रकरण पाचवे

भारतीय निवडणुकांमध्ये माध्यमांचा सहभाग ,राजकीय पक्षांचा प्रचार करण्यासाठी समाज माध्यमांचा होणारा वापर याचा अभ्यास

प्रकरण सहावे

भारतीय लोकशाहीमध्ये पारंपरिक माध्यमे व नव माध्यमे यांचा तुलनात्मक अभ्यास करणे

प्रकरण सातवे

निष्कर्ष

संदर्भ ग्रंथांचा आढावा

भीमैय्या कृष्णन रवि : मॉडर्न मीडिया, इलेक्शन्स अ‍ॅण्ड डेमोक्रसी

माध्यमे हि जनतेचे मत परिवर्तन करणारी असतात. तो त्यांचा स्वभाव असतो. मात्र हे जाणूनबुजून केले जात नाही, तर त्यांच्या कामातून घडत असते. समाजातील सत्ताधीशांचे दोष दाखवने स्वाभाविक असते. माध्यमे समाजाभिमुख व स्वायत्त असतील तरच हे शक्य आहे. नाही तर सत्तेतील व्यक्ती माध्यमांच्या ऐक्यभंग करण्याच्या प्रवृत्तीचा स्वत:साठी वापर करून घेऊ शकतात. माध्यम आणि लोकशाही देशातील माध्यमांचे सध्याचे स्वरूप व परिस्थिती, माध्यमांची मालकी यांचे राजकीय प्रक्रियांच्या संदर्भात लेखकाने विवेचन केले आहे.

इंडियन सोशल - अंकित पाल

संबंधीत संदर्भ पुस्तकात लेखकाने भारतामध्ये समाज माध्यमांचा वापर होण्यास कसा प्रकारे कधी सुरवात कशी झाली त्याची कारणे, यात अण्णा आंदोलन, भ्रष्चाटार विरोधी जण आंदोलन यात माध्यमांची भूमिका कसा प्रकारची होती यातून समजावर त्याचे पडलेले पडसाद, भारतीय निवडणुकांमध्ये कशाप्रकारे प्रथमप्रथम आम आदमी पक्षाने राजकीय प्रचारासाठी समाज माध्यमांचा वापर करण्यात आला आणि याचे सकरात्मक निकाल कसे दिसून आला आहे याचे सविस्तर विवेचन केले आहे.

इंडियन पॉलिटी - एम लक्ष्मीकांत

प्रस्तुत पुस्तकात भारतीय निवडणूक आयोग आणि त्याच्या संबधी संविधानिक तुरतुदी आयोगाचे कार्य प्रणाली, आदर्श आचार संहिता याचे सविस्तर विवेचन केले आहे.

सोशल मीडिया -   योगेश बोराटे

आधुनिक युगात समाज माध्यमांच्या संवादाचा वेग हा अफाट आहे. आज प्रत्याकडे स्मार्ट फोने आहेत त्यातील समाज माध्यमांचा वापर जनतेने कसा प्रकारे करावा याचा बद्दल माध्यम साक्षरता आणण्यास हेय पुस्तक महत्तवाचे आहे

अरुण सारथी : भारतीय लोकशाही शोध आणि आव्हाने रविराज प्रकाशन, मुंबई

या ग्रंथात भारतीय लोकशाही व कायद्याचे राज्य लोकमत वरून लोकशाही पद्धती रुजवण्यासाठी माध्यमांची तसेच राजकीय पक्षांची भूमिका याचा अभ्यास केला आहे

संदर्भ सूची

१) डॉ. विवेक पाटकर,- संशोधन-मार्गावरील प्रवास

२) डॉ. प्रदीप आगलावे, - सामाजिक संशोधन तंत्र व पद्धती

३) रवीश कुमार - फ्री व्हॉइस

४) विश्वनाथ गरुड, डिजिटल पत्रकारिता, गमभन प्रकाशन

५) Swati Chaturvedi, - I Am a Troll: Inside the Secret World of the BJP's Digital Army

६) साधना मासिक लेख

७) दैनिक लोकसत्ता लेख

८) दैनिक लोकमत लेख

९) विषय संबंधी विविध संशोधनपर लेख

मार्गदर्शक **संशोधक**

प्रा. डॉ. संतोष पाटील **गजानन मधुकर घायाळ**

दयानंद कला महाविद्यालय, लातूर

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

सामाजिक विद्याशाखा अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवीचा शोध प्रबंधाचा आराखडा

विषय - भारतीय लोकशाही आणि माध्यमे एक विश्लेषणात्मक अभ्यास

संशोधकाचे नाव - गजानन मधुकर घायाळ

विषय - राज्यशास्त्र

प्रवर्ग - NT-C (धनगर)

मोबाईल नंबर - 8007051115

ईमेल - gajanang111@gmail.com

पत्ता - सुशिलादेवी नगर, जुना औसा रोड, लातूर

मार्गदर्शकाचे नाव - प्रा.डॉ. संतोष पाटील

राज्यशास्त्र विभाग प्रमुख, दयानंद कला महाविद्याल, लातूर

मोबाईल नंबर - 9545267999